<u>नियमित दिवाणी दावा क्र. २६७/२०००</u>

<u>निशाणी क्र. १५६/क सोबत</u>

नांव -- श्री. हिंदुराव रंगराव जाधव

<u>शपथेवर साक्षीदार यांचा उलटतपास वादी तर्फे विधिज्ञ श्री. एम एन बिंदगे यांच्या मार्फत,</u>

६. मी खरेदी नंतर ताबा घेताना सरकारी मोजणी केली नव्हती खाजगी मोजणी केली होती. मला सरकारी मोजणी करण्याची आवश्यकता वाटली नाही. खाजगी मोजणीवर विश्वास होता. खाजगी मोजणीदार सध्या हयात नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी अरुण धोंडी जाधव या खाजगी मोजणीदाराकडून मोजणी करून घेतल्याचे खोटे सांगत आहे.

७. हे म्हणणे खरे नाही की, तुका चांगो मांग याच्या ताब्यात ६ एकर ६ गुंठ्यापेक्षा जास्त जमीन नव्हती. मी सात बारा पाहून खरेदीपत्र केले. सात बारा प्रमाणे क्षेत्र बरोबर असल्याचे मला वाटले. खात्री करून घ्यावी म्हणून खाजगी मोजणी केली. त्याचा नकाशा नाही. नकाशा काढला होता पण तो सध्या उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कैफियतीमध्ये खाजगी मोजणी केल्याचा, नकाशा काढल्याचा व तो नकाशा उपलब्ध नसल्याचा मजकूर नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिनांक २६/०९/१९९१ साली खरेदी पत्रात नमूद केलेल्या क्षेत्राची मिळकत खरेदी केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या खरेदीपत्राप्रमाणे मला तेवढया क्षेत्राचा कब्जा कधीही मिळालेला नव्हता.

८. माझ्या व वादीच्या जमिनीमध्ये किरकोळ बांध आहे. तो सहा इंच उंचीचा आहे लांबी मला सांगता येणार नाही. बांधावर गवत उगवते. बांधावर झाडे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, बांधावर लिंबाची पाच, बाबळीची चार व करंजीचे एक अशी झाडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी वादीने ३२ आर अतिक्रमण केल्या बाबतचा दावा दाखल केलेला आहे. वादीने सन १९९२ ते १९९५ दरम्यान अतिक्रमण केल्याने बी. एन. डी प्रकरण दाखल करावे लागले. मी त्याबाबत वादीला नोटीस दिली नाही. त्यानंतर बांध तयार झाला. मी खरेदी घेताना बांध नव्हता. बांधाऐवजी क्षेत्राच्या खुणा केलेल्या असतात. सन १९९५ पासून बांध आहे. ताबा देणा-या व्यक्तीने छोटे दगड रोवून खुणा केल्या होत्या. खाजगी मोजणीच्या वेळी मी बांध घातलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या व

वादीच्या मिळकतीमध्ये सहा फूट उंचीचा पूर्वापार बांध आहे. हे म्हणणे खरे नाही की, बांधाच्या पलीकडे वादीचे तीस गुंठे जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने अतिक्रमण केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीकडे पूर्वी खरेदी केल्यापासून बांधाच्या पलीकडे ३० गुठे व अलीकडे ३० गुंठे अशी ६० गुंठे मिळकत पहिल्यापासून आहे. हे म्हणणे खरे नाही की, या ६० गुंठे क्षेत्राचा कब्जा मला कधीही मिळालेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचा दावा सन १९९७ मध्ये कोल्हापूर येथे दाखल झाला होतो तो नंतर येथे वर्ग झाला. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल झाल्यानंतर मी अर्ज देवून वादीने अतिक्रमण केल्याचा बनाव रचला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला ३० गुंठे क्षेत्र सोडावे लागू नये म्हणून सात बारा प्रमाणे मोजणीचा बनाव रचला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादातील खरेदी पत्राप्रमाणे ६० गुंठे क्षेत्राचा कब्जा मला कधीही मिळालेला नाही.

९. हे म्हणणे खरे नाही की, मंत्रालयातील प्रकरणाचा निकाल माझ्या बाजूने झाल्याचे खोटे सांगत आहे. मालकी हक्काबाबत वाद असल्याने तो दिवाणी कोर्टातून वाद ठरवून घ्या असे निर्देश मंत्रालयातील प्रकरणाच्या आदेशात झाले किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत तुका चांगो मांग, वारणा फूड प्रॉडक्ट यांच्या ताब्यात कधीही नसल्याचे मला माहिती होते. हे म्हणणे खरे नाही की, तुका चांगो मांग याच्या नावे एक एकर वीस गुंठे क्षेत्र त्याच्या मालकीचे नसताना जास्त लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या ताब्यात १५ एकर ५ गुंठे क्षेत्र असल्याचे दाखविले होते. हे म्हणणे खरे नाही की, महसूल दप्तरी झालेल्या चुकीच्या क्षेत्राच्या नोंदीचा मी गैरफायदा घेत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला तीस गुंठे क्षेत्र सोडावी लागू नये म्हणून मी खोटा जबाब देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या ताब्यात तेवढे क्षेत्र नव्हते म्हणून मी मोजणीचा नकाशा किंवा इतर कागदपत्रे दाखल करत नाही.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरी/-

पेठ-वडगांव

दिनांक. १८/१२/२०२५.

(**श्रीनिवास अ. कुलकर्णी**)

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पेठवडगांव.